# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई-९३

---

## सूचना पत्र

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ८६५ रिक्त पदे भरणेकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विवयां), लघुलेखक (निम्न श्रेणी), वरिष्ठ लेखापाल, सहाय्यक, लिपीक टंकलेखक, भूमापक, तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२), जोडारी (श्रेणी-२), पंपचालक (श्रेणी-२) व वीजतंत्री (श्रेणी-२) या संवर्गातील ५०२ पदे भरणेकामी दि.२०/०८/२०२१ ते दि.२७/०८/२०२१ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या आहेत. सदर परीक्षेची गुणवत्ता यादी दि.१५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येत असून निवड यादी व प्रतिक्षा यादी स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

तथापि, उक्त पदांपैकी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाकरीता २ सत्रामध्ये, सहाय्यक या पदाकरीता ६ सत्रामध्ये व लिपीक टंकलेखक या पदाकरीता ६ सत्रामध्ये परीक्षा घेण्यात आल्या असल्याने सदर पदांकरीता सामान्यीकरण (Normalization) करण्यात येऊन त्या अनुषंगाने गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), सहाय्यक, लिपीक टंकलेखक या पदांकरीता सामान्यीकरण (Normalization) करतेवेळी महाराष्ट्र शासनाचा CET कक्ष (State Common Entrance Test Cell) यांचेकडील सूत्राचा वापर करण्यात आला असून त्याअनुषंगाने प्राप्त गुणांची टक्केवारी (Normalized score (Percentile)) नुसार प्रारुप गुणवत्ता यादी तयार करण्यात आली आहे. (सोबत महाराष्ट्र शासनाचा CET कक्षाचे सामान्यीकरणाचे दस्तावेज संलग्न करण्यात येत आहे.)

तसेच उर्वरित कनिष्ठ अभियंता (विवयां), लघुलेखक (निम्न श्रेणी), वरिष्ठ लेखापाल, भूमापक, तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२), जोडारी (श्रेणी-२), पंपचालक (श्रेणी-२) व वीजतंत्री (श्रेणी-२) या पदांकरीता प्राप्त गुण जाहीर करण्यात येत आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**महाव्यवस्थापक (मबवि)**
**मऔविम, मुंबई-९३**